# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक :-के.आर-३०४०/२०२३

**अपिलार्थी,श्री.नोवेल साळवे**
**पोस्ट बॉक्स नंबर वन ३३,**
**कल्याण डी सी कल्याण (प), जि.ठाणे**

विरुध्द

जन माहिती अधिकारी, मालमत्ता विभाग
उल्हासनगर महानगरपालिका
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

प्रथम अपीलीय प्राधिकारी, मालमत्ता विभाग
उल्हासनगर महानगरपालिका
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : *२९.४.२०२५*

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ८.६.२०२३ | --- | १४.७.२०२३ | --- |

अपिलार्थी यांनी दि.२९.८.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "माहिती देण्यास टाळाटाळ करणे, जाणीवपूर्वक माहिती लपवणे." असे कारण नमूद करुन कलम *१९(३)* अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक *२९.४.२०२५* रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. शरद मोहन परदेशी, वरिष्ठ लिपिक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(१) उल्हासनगर महापालिकेच्या अखत्यारीत असलेले शांतीनगर येथील कोहिनूर वेव्स इमारत आणि उल्हास नदीच्या मध्यभागी असलेल्या खाली भूखंडावर कोणता आरक्षण आहे.)*

*(२)शांतीनगर येथील कोहिनूर वेव्स आणि उल्हास नदीच्या मध्यभागी असलेल्या या उल्हासनगर महापालिकेच्या अखत्यारीत असलेल्या या खाली भुखंडाला महापालिका प्रशासन कुठल्याही सांस्कृतिक कार्यक्रमासाठी देते का आणि त्याचे दिवसाला भाडे किती आहे.*

*(३) वरील भूखंडावर कुठल्या वर्षी आरक्षण टाकण्यात आले व त्याचे ठराव कधी मंजूर केला गेला)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम *१९(१)* अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी *अपिलार्थी* यांनी असे निवेदन केले की, *त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही तसेच* प्रथम अपिलिय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपिलावर कोणतीही सुनावणी झाली नाही किंवा त्यांच्याकडून सदर प्रथम अपिलावर कोणतेही आदेश पारित करण्यात आले नाहीत.

आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. मधुरा केणी,प्र. मालमत्ता व्यवस्थापक यांचे प्रतिनिधी श्री. शरद मोहन परदेशी, वरिष्ठ लिपिक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर *हे उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांनी* माहिती अधिकार अधिनियमांतर्गत *जोडपत्र "अ" या नावाने सादर केलेला मूळ* माहिती *अर्ज त्यांचा विभागास प्राप्त झाला नाही. त्यामुळे ते अपिलार्थींना माहिती देऊ शकले नाहीत. पुढे त्यांनी असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही मालमत्ता विभागाशी संबंधित नसून नगररचना विभगाशी संबंधित आहे.*

या संदर्भात *अपिलार्थी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना कोणत्याही विभागाकडून काहीही उत्तर मिळालेले नाही. त्यामुळे ही माहिती* प्राप्त *करून* घेण्यासाठी त्यांना झालेल्या *मानसिक व आर्थिक नुकसानासाठी त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी.*

दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचा दि.८.६.२०२३ रोजीचा जोडपत्र "अ" मध्ये सादर केलेला माहिती अर्ज हा उल्हासनगर महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रामधील "माहिती अधिकार कक्ष" येथे दाखल केला होता. सदरच्या कक्षाने हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला नाही असे विद्यमान जन माहिती यांचे प्रतिनिधी श्री.शरद मोहन परदेशी, वरिष्ठ लिपिक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांचे म्हणणे आहे. तथापि, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलाबद्दलही काय झाले हेसुध्दा विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. शरद मोहन परदेशी, वरिष्ठ लिपिक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर हे सांगू शकले नाहीत. म्हणजेच एकूण माहिती अधिकार अधिनियमासंबंधीचा अर्ज उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर प्रशासनाने गलथानपणे हाताळलेला आहे. तसेच या अर्जाचा संपूर्ण प्रवास म्हणजेच तो कोणाकडे सादर झाला. त्यानंतर तो कुठल्या अधिका-यांकडे देण्यात आला. याबाबतचा सविस्तर लेखी अहवाल माहिती अधिकार कक्षाचे प्रमुख असलेले सहा. आयुक्त (सा. प्र) उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल.

त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुढील १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. जी माहिती त्यांच्या विभागाशी संबंधित नाही अशी माहिती ज्या विभागाशी संबंधित आहे. त्या विभागाकडून प्राप्त करुन वर नमूद केलेल्या कालावधीत अपिलार्थींना विनामूल्य पुरविणे उचित होईल.

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर प्रशासनाने अपिलार्थींचा माहिती अधिकार अधिनियमांतर्गतचा अर्ज हा योग्य रितीने न हाताळल्याने व तो संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे न दिल्याने अपिलार्थींना माहिती प्राप्त होण्यास विलंब झाला व परिणामी त्यांचे मानसिक व आर्थिक नुकसान झाले. अपिलार्थींच्या या नुकसानासाठी उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर प्रशासन हे जबाबदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते व म्हणून अपिलार्थी श्री. नोवेल साळवे यांना झालेल्या मानसिक व आर्थिक नुकसानापोटी **उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर या सार्वजनिक प्राधिकरणाद्वारे** रु.२०,०००/- इतकी नुकसान भरपाई अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अंतर्गत का देण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा **आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर** यांनी पुढील सुनावणीस लेखी स्वरूपात सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी **अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि.शुल्क पुरवावी.** जी माहिती त्यांच्या विभागाशी संबंधित नाही अशी माहिती ज्या विभागाशी संबंधित आहे. त्या विभागाकडून प्राप्त करुन वर नमूद केलेल्या कालावधीत अपिलार्थींना विनामूल्य पुरवावी.

२. उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अपिलार्थी यांचा दि.८.६.२०२३ रोजीचा माहिती अधिकार अधिनियमासंबंधीचा अर्ज हा योग्य रितीने न हाताळल्याने व तो संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे न दिल्याने, या अर्जाचा संपूर्ण प्रवास म्हणजेच तो कोणाकडे सादर झाला. त्यानंतर तो कुठल्या अधिका-यांकडे देण्यात आला. **याबाबतचा सविस्तर लेखी अहवाल माहिती अधिकार कक्षाचे प्रमुख असलेले सहा. आयुक्त (सा. प्र) उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी आयोगाकडे दि.२७.५.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा.**

३. उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर प्रशासनाने अपिलार्थींचा माहिती अधिकार अधिनियमांतर्गतचा अर्ज हा योग्य रितीने न हाताळल्याने व तो संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे न दिल्याने अपिलार्थींना माहिती प्राप्त होण्यास विलंब झाला व परिणामी त्यांचे मानसिक व आर्थिक नुकसान झाले. अपिलार्थींच्या या नुकसानासाठी उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर प्रशासन हे जबाबदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते व म्हणून अपिलार्थी श्री. नोवेल साळवे यांना झालेल्या मानसिक व आर्थिक नुकसानापोटी **उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर या सार्वजनिक प्राधिकरणाद्वारे** रु.२०,०००/- (अक्षरी रु.वीस हजार रूपये फक्त) इतकी नुकसान भरपाई अपिलार्थीस माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग
कोकण खंडपीठ

अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अंतर्गत का देण्यात येऊ नये, **याचा लेखी** *खुलासा आयुक्त*, **उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर** *यांनी*आयोगाकडे **दि.२७.५.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता** *सादर* **करावा.**

**४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२७.५.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ एप्रिल, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर,**
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

सहा. आयुक्त (सा.प्र.), उल्हासनगर महानगरपालिका, (माहिती अधिकार कक्ष)
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३
**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक,
मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक :-के.आर-३०४०/२०२३**
**अपिलार्थी,श्री.नोवेल साळवे**
**सुनावणी दिनांक ३१.७.२०२५ (In continuation of order dt. २९.४.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना आयोगाच्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही त्यामुळे त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्यात यावी.

आयोगाने दि.२९.४.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.१ मध्ये वर नमूद केल्याप्रमाणे आदेशित केले होते. तथापि, त्यानंतरदेखील आजपर्यंत अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली नाही. म्हणजेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. मधुरा केणी, मालमत्ता व्यवस्थापक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी आयोगाच्या आदेशानंतरही अपिलार्थींना माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे.

आयोगाच्या दि.२९.४.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. २ मध्ये वर नमूद केल्याप्रमाणे आदेशित केले होते. तथापि, आजच्या सुनावणीस *माहिती अधिकार कक्षाचे प्रमुख असलेले सहा. आयुक्त (सा. प्र)* उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर हे अनुपस्थित आहेत तसेच त्यांनी या संदर्भात कोणताही लेखी अहवालदेखील आयोगास सादर केलेला नाही.

त्याचप्रमाणे आयोगाच्या दि.२९.४.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. ३ मध्येदेखील वर नमूद केल्याप्रमाणे आदेशित केले होते. तथापि, ***आयुक्त*, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर** यांचेकडूनही या संदर्भात कोणताही लेखी खुलासा आयोगास सादर करण्यात आलेला नाही.म्हणजे एकूणच आयोगाच्या आदेशाची कोणतीही दखल उल्हासनगर महानगरपालिका यांनी तसेच जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली नाही असे दिसून येते.

सबब, आयोगाच्या दि.२९.४.२०२५ रोजीच्या आदेशानंतरही अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून न दिल्याने विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्यास झालेल्या विलंबाबद्दल त्यांचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल.

आयोगाच्या दि.२९.४.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.३ मध्ये आदेशित केल्याप्रमाणे आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी त्यांचा कोणताही समर्थनीय लेखी खुलासा आयोगास सादर केलेला नाही. यास्तव आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना या संदर्भात कोणताही लेखी खुलासा सादर करावयाचा नाही असे स्पष्ट होत

असल्याने अपिलार्थी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अंतर्गत रू.२०,०००/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाने सदरची नुकसान भरपाईची रक्कम धनादेशाद्वारे अपिलार्थी श्री.नोवेल साळवे यांना अदा करून त्याबाबतचा कार्यपूर्ती अहवाल पुढील सुनावणीस आयोगास सादर करावा. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयोगाच्या दि.२९.४.२०२५ रोजीच्या आदेशानंतरही अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून न दिल्याने विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्यास झालेल्या विलंबाबद्दल **त्यांचा लेखी खुलासा आयोगाकडे दि.१०.७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

२. आयोगाच्या दि.२९.४.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.३ मध्ये आदेशित केल्याप्रमाणे आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी त्यांचा कोणताही समर्थनीय लेखी खुलासा आयोगास सादर केलेला नाही. यास्तव आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना या संदर्भात कोणताही लेखी खुलासा सादर करावयाचा नाही असे स्पष्ट होत असल्याने अपिलार्थी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अंतर्गत रू.२०,०००/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे. **उल्हासनगर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाने सदरची नुकसान भरपाईची रक्कम धनादेशाद्वारे अपिलार्थी श्री.नोवेल साळवे यांना अदा करून त्याबाबतचा कार्यपूर्ती अहवाल आयोगाकडे दि.१०.७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता सादर करावा.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई :४०० ६१४.
दिनांक : २७ मे, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर,**
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक,
मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

**अपिल क्रमांक :के.आर-३०४०/२०२३**
**अपिलार्थी,श्री.नोवेल साळवे**
**सुनावणी दिनांक ३१.७.२०२५ (In continuation of order dt. २७.५.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थींचे प्रतिनिधी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. छाया प्रकाश डांगळे, मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका या उपस्थित आहेत.

या प्रकरणी आयोगाच्या दि.२७.५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये, "*आयोगाच्या दि.२९.४.२०२५ रोजीच्या आदेशानंतरही अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून न दिल्याने विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्यास झालेल्या विलंबाबद्दल*

*त्यांचा लेखी खुलासा आयोगाकडे दि.१०.७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी."* असे आदेशित केले होते. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक,मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी दि.३१.७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी मालमत्ता विभागाचा पदभार दि.२८.१०.२०२४ रोजी स्वीकारला आहे. अपिलकर्ता श्री. नोवेल साळवी यांनी दि.८.६.२०२३ रोजी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज केला असून उपरोक्त अर्ज त्यांच्या विभागाला प्राप्त झालेला नव्हता. या प्रकरणाची माहिती त्यांना आयोगाच्या कार्यालयाच्या दि.२८.३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागाकडून दि.११.४.२०२५ रोजी पत्र पाठविल्यानंतर मिळाली. त्यानंतर दि.२९.४.२०२५ रोजी आयोजित सुनावणी दरम्यान दिलेल्या आदेशानुसार त्यांनी अपिलार्थी श्री. नोवेल साळवी यांना दि.३०.४.२०२५ रोजी संपर्क साधला. त्यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत दाखल केलेला दि.८.६.२०२३ चा अर्ज व्हॉटसअॅप मेसेजद्वारे त्यांना पाठविला. त्यानुसार मालमत्ता विभगामध्ये उपलब्ध असलेली माहिती त्याच दिवशी दि.३०.४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना उपलब्ध करून दिलेली आहे. त्यानंतर त्यांची दि.९.६.२०२५ रोजी पासून महापालिका अभ्यासिका येथे बदली झालेली आहे. मालमत्ता विभागात उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे आणि तत्परतेने प्रयत्न केले असल्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊ नये अशी त्यांनी विनंती केली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी त्यांच्या लेखी खुलाशासोबत अपिलार्थी यांना दिलेले दि.३०.४.२०२५ रोजीचे पत्र आयोगास सादर केले आहे. त्यानुसार त्यांनी अपिलार्थी यांना मुद्दा क्र. २ ची माहिती अपिलार्थींना पाठविली आहे व मुद्दा क्र. १ व ३ ची माहिती देण्यासाठी अपिलार्थी यांचा अर्ज जन माहिती अधिकारीतथा कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) अन्वये वर्ग केला आहे व अपिलार्थी यांना असे कळविले आहे की, आपण सदर कार्यालयास संपर्क साधून मुद्दा क्र. १ व ३ ची माहिती उपलब्ध करून घ्यावी.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांची ही कार्यवाही आयोगाने दि.२९.४.२०२५ रोजी दिलेल्या आदेशाच्या विपरीत आहे. दि.२९.४.२०२५ च्या आदेशामध्ये स्पष्ट स्वरूपात नमूद केले आहे की, *"विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती त्यांच्या विभागाशी संबंधित नाही अशी माहिती ज्या विभागाशी संबंधित आहे. त्या विभागाकडून प्राप्त करून वर नमूद केलेल्या कालावधीत अपिलार्थींना पुरवावी."* अशा परिस्थितीत विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी जर मुद्दा क्र. १ व ३ ची माहिती जर जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या विभागाशी संबंधित होती तर ती माहिती संबंधित विभागाकडून प्राप्त करून अपिलार्थींना उपलब्ध करून देणे आवश्यक होते. तथापि, तसे न करता ही माहिती अपिलार्थींना देण्यासाठी सदरचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) अंतर्गत जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांना हस्तांतर केला.

वास्तविक जर एखादया अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे अशा सार्वजनिक प्राधिकरणाकडून प्राप्त करून घेणे आवश्यक होते. जर अशी माहिती अशा सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध नसेल तर ती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असण्याची शक्यता आहे अशा सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदरचा माहिती अर्ज, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) अन्वये ५ दिवसांत हस्तांतर करणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी माहिती मागणारा अर्ज दि.८.६.२०२३ रोजी केला आहे. त्यामुळे तो दि.३०.४.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) अन्वये दुस-या विभागाकडे हस्तांतर करता येत नाही. त्याशिवाय आयोगाने स्पष्ट आदेश दिले असतानाही त्या आदेशाची दखल न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता

व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी हा अर्ज नगररचना विभाग यांना हस्तांतर केला व परिणामी अपिलार्थी यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अशा परिस्थितीत विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांचा दि.३१.७.२०२५ रोजीचा खुलासा मान्य करता येत नाही.

आयोगाने दि.२७.५.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. २ मध्ये नमूद केल्यानुसार अपिलार्थी यांना, "*माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अंतर्गत रू.२०,०००/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे. उल्हासनगर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाने सदरची नुकसान भरपाईची रक्कम धनादेशाद्वारे अपिलार्थी श्री.नोवेल साळवे यांना अदा करून त्याबाबतचा कार्यपूर्ती अहवाल आयोगाकडे दि.१०.७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता सादर करावा.*" असेदेखील आदेशित केले होते. तथापि, त्याबाबतचा लेखी अहवालदेखील आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी आयोगास अद्याप सादर केलेला नाही.

आयोगाच्या दि. २९.४.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. २ मध्ये, "*उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अपिलार्थी यांचा दि.८.६.२०२३ रोजीचा माहिती अधिकार अधिनियमासंबंधीचा अर्ज हा योग्य रितीने न हाताळल्याने व तो संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे न दिल्याने, या अर्जाचा संपूर्ण प्रवास म्हणजेच तो कोणाकडे सादर झाला. त्यानंतर तो कुठल्या अधिका-यांकडे देण्यात आला. याबाबतचा सविस्तर लेखी अहवाल माहिती अधिकार कक्षाचे प्रमुख असलेले सहा. आयुक्त (सा.प्र.), उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी आयोगाकडे दि.२७.५.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा.*" असेदेखील आदेशित करण्यात आले होते. तथापि, असा अहवाल *सहा. आयुक्त (सा. प्र)* उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांच्याकडून अद्यापपर्यंत लेखी अहवाल प्राप्त झालेला नाही.

सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांचा लेखी खुलास अमान्य करणे उचित होईल. त्यांनी आयोगच्या आदेशाप्रमाणे दि.१४.५.२०२५ रोजीपर्यंत अपिलार्थींना माहिती देणे अपेक्षित होते. त्यामुळे दि.१४.५.२०२५ नंतर अपिलार्थींना माहिती देण्यास झालेल्या विलंबासाठी त्या जबाबदार असल्याचे दिसून येते. त्या सदर पदावर दि.९.६.२०२५ पर्यंत कार्यरत होत्या म्हणून दि.१४.५.२०२५ ते दि.९.६.२०२५ अशा एकूण २७ दिवसांच्या विलंबासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर या जबाबदार असल्याचे दिसून येते. यास्तव त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये प्रति दिन रु.२५०/- याप्रमाणे एकूण २७ दिवसांसाठी ६७५०/- इतकी शास्ती आकारणे क्रमप्राप्त आहे. सदरची वसूली त्यांची २ मासिक वेतनातून कपात करून त्याबाबचा लेखी अहवाल विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल.

आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांना याद्वारे असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आयोगाच्या दि.२७.५.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. २ नुसार अपिलार्थी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अंतर्गत रू.२०,०००/- इतकी दयावयाची नुकसान भरपाईची रक्कम अपिलार्थींना अदा करून त्याबाबतचा लेखी अहवाल पुढील सुनावणीस आयोगास सादर करणे उचित होईल.

आयोगाच्या दि.२९.४.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. २ नुसार, माहिती अधिकार कक्षाचे प्रमुख असलेल्या श्रीम. सलोनी निमकर, सहा. आयुक्त (सा.प्र), उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अद्यापपर्यंत आयोगास लेखी अहवाल सादर केला नसल्याने त्यांना आयोगासमोर उपस्थित राहण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ (३) अन्वये समन्स बजावण्यात येत आहे. याची बजावणी वरीष्ठ पोलीस निरिक्षक, उल्हासनगर, मध्यवर्ती पोलीस स्टेशन, सेंट्रल हॉस्पिटलच्या मागे, ता. उल्हासनगर, जि. ठाणे ४२१००३ यांनी करावी तसेच त्यांनी श्रीम. सलोनी निमकर,सहा. आयुक्त (सा.प्र), उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांना आयोगासमोर पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहणेबाबत कळविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अपिलार्थी यांच्या दि.८.६.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून आयोगाच्या

आदेशानंतरही माहिती पुरविली नसल्यामुळे त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये रु.६७५०/- (अक्षरी रु. सहा हजार सातशे पन्नास रुपये फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ०२ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थ संकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल **उपायुक्त (सामान्य प्रशासन विभाग), उल्हासनगर महानगरपालिका** यांनी आयोगास सादर करावा.

२. **आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांना याद्वारे असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आयोगाच्या दि.२७.५.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.२ नुसार अपिलार्थी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अंतर्गत रू.२०,०००/- इतकी दयावयाची नुकसान भरपाईची रक्कम अपिलार्थींना अदा करून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगास दि.२५.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता सादर करावा.**

३. **आयोगाच्या दि.२९.४.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. २ नुसार, माहिती अधिकार कक्षाचे प्रमुख असलेल्या श्रीम. सलोनी निमकर, सहा. आयुक्त (सा.प्र), उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अद्यापपर्यंत आयोगास लेखी अहवाल सादर केला नसल्याने त्यांना आयोगासमोर उपस्थित राहण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ (३) अन्वये समन्स बजावण्यात येत आहे. याची बजावणी वरीष्ठ पोलीस निरिक्षक, उल्हासनगर, मध्यवर्ती पोलीस स्टेशन, सेंट्रल हॉस्पिटलच्या मागे, ता. उल्हासनगर, जि. ठाणे ४२१००३ यांनी करावी तसेच त्यांनी श्रीम. सलोनी निमकर, सहा. आयुक्त (सा.प्र), उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांना आयोगासमोर पुढील सुनावणीस स्वतः उपस्थित राहणेबाबत कळवावे. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

४. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३१ जुलै, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर,**
**मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.**

**आदेशातील मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना.**
श्रीम. सलोनी निमकर, सहा. आयुक्त (सा.प्र), उल्हासनगर महानगरपालिका, (माहिती अधिकार कक्ष)
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३
**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. छाया प्रकाश डांगळे, प्र. मालमत्ता व्यवस्थापक,
मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३ **यांचेमार्फत रवाना**.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई यांचे कार्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र. ५२७/५२८, कोंकण भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

३. उप आयुक्त (सा.प्र), सामान्य प्रशासन विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

४. आहरण व संवितरण अधिकारी/मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लेखा विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

५. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.मधुरा केणी, प्र.मालमत्ता व्यवस्थापक,
मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ